# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २१/०४/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०४/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०४/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| २ | विरार पूर्व प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथील दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुली करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत. | **निर्णय :-** वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. दि. ०१/०४/२०१६ पासून आजतागायत महानगरपालिका कर्मचाऱ्यांकडून सदर बाजारकर वसुली करण्यांत येत असून दि.३०/०४/२०१६ पर्यंत कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करण्यांत येणार आहे. महानगरपालिकेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. सबब दिर्घकाळ कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करणे शक्य नाही. व ई -निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस विलंब होणार असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत सन २०१५-१६ मधील मंजूर ठेकेदार मे. मेहुल वर्तक यांना २०१६-१७ च्या दर्शनी मुल्यावर १०% वाढ गृहीत धरून बाजार वसुलीचा ठेका देण्यांत यावा अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| ३ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'आय' अंतर्गत येणारे मार्केट/बाजारपेठ सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेबाबत. | **ठराव :-** सदर कामांबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सन २०१६-१७ हे वित्तीय वर्ष सुरु झाले असून सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या कर्माचाऱ्यांमार्फत माहे एप्रिल २०१६ पासून वसुली केली जात आहे. तरी वरील २ मार्केट/बाजारपेठांचा २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता ई निविदा प्रक्रियेत उपरोक्त २ बाजारांकरीता प्राप्त झालेले दर मंजूर करणे व करारनामा करुन कार्यादेश देणे. तसेच प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत माहे एप्रिल २०१६ ची वसुली महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत करणे अशी शिफारस करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.सुनील आचोळकर** |
| ४ | उद्यानांचे देखभालीचे काम करणेबाबत निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत पूर्वीच्या ठेक्यास मुदतवाढ देणेचे प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय :-**उपरोक्त प्रस्तावांवर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई-विरार शहर महानगरपालिका संपूर्ण क्षेत्रातील उद्यान देखभालीचे काम ठेकेदार यांचे कडून सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून सुरु आहे. सन २०१६-१७ करिता उद्यानांची देखभाल दुरुस्ती करणेबाबतच्या कामाबाबत मा. महासभा दि.२९/०३/२०१६ रोजीच्या निर्णयानुसार / चर्चेनुसार महिला बचत गट यानुसार महिला सक्षमीकरण करणेअंतर्गत सदर कामे देणे तसेच पाण्याची बचत होणे करीता ठिबक व तुषार सिंचन करण्याची प्रस्तावित आहे. तरी सदर निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सद्यस्थितीत उद्यानांचे देखभालीचे काम करणारे सन २०१५-१६ चे मंजुर ठेकेदार यांना पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि.०१/०४/२०१६ पासून मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि, सदर मंजूर ठेकेदारानी माहे एप्रिल २०१६ मध्ये त्यांच्या आदेशामधील ज्या उद्यानांची देखभाल - दुरुस्ती केलेली नसेल अशा उद्यानांची उद्यान अधिक्षक पाहणी करतील. तरी, |

| | | |
|---|---|---|
| | | अशा उद्यानांचे देयक त्यांना देण्यात येवू नये. या अटीच्या अधिन राहून पूर्वलक्षी प्रस्तावाने दि.०१/०४/२०१६ पासून नविन उपरोक्त महिला बचत गटांमार्फत देखभाल व दुरुस्तीचे नविन यंत्रणा अस्तित्वात येई पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्री.प्रकाश दुमा रॉड्रीक्स** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथील दैनंदिन बाजार कर वसुली करणेकामी निविदा प्रक्रिया मुदतीत पुर्ण न झाल्याने मुदत वाढ देणे बाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (अे) अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभागात दैनंदिन बाजार वसुलीकामी ५ (पाच) निविदाधारक प्राप्त झाले होते. परंतु त्यापैकी (एक) निविदाधारक प्राप्त असून ४(चार) निविदाधारक अपात्र झाल्याने निविदेची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने दि. ०७/०४/२०१६ ते दि. १३/०४/२०१६ पर्यंत<br>फेरनिविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. तसेच बाजार कर वसूलीची मुदत दि.०९/०४/२०१६ रोजी संपत असल्याने प्रकिया पूर्ण होईपर्यंत पूर्वीचेच ठेकेदार यांस मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ६ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांची कामे (By out sourcing) अभिकर्त्यांमार्फत करून घेणेकरीता अभिकर्त्यांची नेमणुक करणेबाबत. | **ठराव :-** सदरच्या विषयाच्या गोषवाऱ्यात आऊंट सोर्सिंगद्वारे अभिकर्त्याची नेमणूक करुन मनुष्यबळ पुरविणेच्या विषयाबाबत सविस्तर माहिती नमुद न केल्यामुळे व हा विषय स्वतंत्र व वेगळा आहे. त्यामुळे याबाबत परत सविस्तर प्रस्ताव सादर करावा व तुर्तास सदरचा विषय तहकुब ठेवावा अशी ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सुनील आचोळकर सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव** |
| ७ | प्रभाग समिती एच नवघर माणिकपुर कार्यालयाच्या दुसऱ्या माळ्याच्या नुतनीकरण करणेकामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्राप्त निविदांच्या दरांची तुलना केली असता मे. ओमकार कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेमधील बाबीचे दर कमी असल्याने वाटाघाटी करून प्राप्त झालेले दरांना मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. ओमकार कन्स्ट्रक्शन यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव** |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा कार्यक्षेत्रातील आचोळे हद्दितील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या निविदा स्विकृत करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ड) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौजे आचोळे येथील दैनिक बाजार कर वसुली कामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांपेक्षा मे.आर.एस. इंटरप्रायजेस यांची रक्कम रु. ३८,४१,०००/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली असून जादा देकाराची निविदा स्विकृत करुन संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवल** |
| ९ | वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा कार्यक्षेत्रातील तुळींज हद्दितील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या निविदा स्विकृत करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ब) कार्यक्षेत्रातील मौजे तुळींज येथील दैनिक बाजार कर वसुली कामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांपेक्षा श्री.अब्बास एच. शेख यांची रक्कम रु. ४३,२०,०००/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली असून जादा देकाराची निविदा स्विकृत करुन संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अब्दुल हक पटेल सूचक :- मा.श्री. मिलिंद घरत** |

| | | |
|---|---|---|
| १० | वाहने, यंत्रसामुग्री व दुरुस्ती करणाऱ्या निविदाकारास मुदतवाढ मिळणेस मंजुरीबाबत. | **ठराव :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करून चर्चा केली असता महानगरपालिकेस सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ ह्या वित्तीय वर्षासाठी आवश्यकतेनुसार विविध प्रकारची वाहने व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस यंत्रसामुग्री भाडे तत्वावर घेणेबाबतची तसेच सन २०१६-१७ ह्या वित्तीय वर्षासाठी महापालिका मालकीची वाहनांची दुरुस्ती करणेबाबतची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. ०१/०४/२०१६ पासून उपरोक्त तीनही कामांसाठी मागील संबंधित कामाच्या मंजूर निविदाधारकांना मुदतवाढ देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री.मिलिंद घरत** |